मफुकृवि ई वार्ता
फेब्रुवारी २०२२

वर्ष :२, अंक क्रं. : १४, फेब्रुवारी, २०२२ महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

## श्री. सुनिल घाटुळे व श्री. रशीद गावित हे आहेत फेब्रुवारी महिन्याचे महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे आयडॉल्स




**दि. १ फेब्रुवारी, २०२२.** महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील यांच्या संकल्पनेतून विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील प्रगतशील शेतकरी व महात्मा फुले कृषि विद्यापीठात पदवी घेतलेले यशस्वी कृषि उद्योजक यांचा परिचय समस्त शेतकरी वर्गाला आणि विद्यार्थ्यांना व्हावा या उद्देशाने कुलगुरु डॉ. पाटील यांनी नविन संकल्पना राबविली आहे. यामध्ये दर महिन्याला एक प्रगतशील शेतकरी व एक कृषि पदविचा कृषि उद्योजक यांच्या कार्याविषयी माहिती असलेला फलक विद्यापीठ प्रवेशद्वार, कृषि तंत्रज्ञान माहिती केंद्राच्या दर्शनी भागात तसेच विद्यार्थी वसतीगृहाचा दर्शनी भागात या ठिकाणी लावण्यात येतो तसेच विद्यापीठाच्या दहा जिल्ह्यांच्या कार्यक्षेत्रातील कृषि महाविद्यालये, संशोधन केंद्रे आणि कृषि विज्ञान केंद्रे येथील प्रवेशद्वाराजवळ लावण्यात येतो जेणेकरुन संबंधीत प्रगतशील शेतकरी व कृषि उद्योजक यांच्या कार्याचा परिचय विद्यापीठाला आणि कृषि महाविद्यालयांना, कृषि संशोधन केंद्रांना व कृषि विज्ञान केंद्राना भेट देण्यासाठी येणाऱ्या शेतकरी, अधिकारी व विद्यार्थ्यांना होतो.

फेब्रुवारी २०२२ या महिन्याकरीता आयडॉल्स म्हणुन धनराट, ता. नवापूर, जि. नंदुरबार येथील श्री. रशीद गावित व कृषि उद्योजक म्हणुन कोल्हापूर कृषि महाविद्यालयातून पदवीचे शिक्षण घेतलेले अनगर, ता. मोहोळ, जि. सोलापूर येथील श्री. सुनिल घाटुळे यांचा समावेश आहे. श्री. रशीद गावित यांनी छोटे रेझर तयार करुन गादी वाफ्यावर खरीप व उन्हाळी हंगामातील भात, कांदा इ. पिकांचे रेषा ओढून बी पेरण्याचे तंत्र विकसीत करुन परिसरातील शेतकऱ्यांना ते वापरण्यास प्रवृत्त केले. श्री. रशीद गावित यांनी कृषक मंडळामार्फत शास्त्रीय विश्लेषणाच्या आधारे नवापूर देशी तुरीला बौध्दिक संपदा भारत सरकार भौगोलीक उपदर्शन (जी.आय.) म्हणून नोंद मिळविली. कृषि उद्योजक असलेले श्री. सुनिल घाटुळे यांनी अत्याधुनिक व संगणकीकृत नर्सरी, हवामान अद्ययावत नर्सरी, स्वतंत्र हवामान केंद्र, सोलर युनिटचा वापर यासह ४५ एकर क्षेत्रात पाणी अडवा पाणी जिरवा ही यंत्रणा कार्यान्वीत करुन हे नाविन्यपूर्ण तंत्रज्ञान वापरुन आपल्या नर्सरी उद्योगात ५० लोकांना कायमस्वरुपी रोजगार उपलब्ध करुन दिला आहे.

वर्ष :२, अंक क्रं. : १४, फेब्रुवारी, २०२२ महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

## मा. कुलगुरु यांच्या उपस्थितीत ड्रोन तंत्रज्ञान प्रात्यक्षिकाचे आयोजन



**दि. २५ फेब्रुवारी, २०२२.** भारतातील महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी हे एकमेव विद्यापीठ असे आहे की जेथे ड्रोनची सुसज्य प्रयोगशाळा आहे. शेतीमध्ये ड्रोनचा वापर करुन शेतीची उत्पादकता वाढविली जावू शकते, यासाठी गावातील तरुणांनी ड्रोन तंत्रज्ञान आत्मसात करुन उद्योजक होणे ही काळाची गरज आहे असे प्रतिपादन कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील यांनी केले. जागतीक बँक अर्थसहाय्यीत राष्ट्रीय कृषि उच्च शिक्षण प्रकल्प व भारतीय कृषि अनुसंधान परिषद, नवी दिल्ली यांचे संयुक्त विद्यमाने हवामान अद्ययावत शेती व जलव्यवस्थापनाचे आधुनिक कृषि विज्ञान व तंत्रज्ञान केंद्र, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथे कार्यरत आहे. या प्रकल्पांतर्गत ड्रोनद्वारे औषध फवारणी प्रात्यक्षिकाचे आयोजन उक्कलगांव, ता. श्रीरामपूर येथे श्री. मच्छिंद्र थोरात यांच्या प्रक्षेत्रावर करण्यात आले होते. या प्रात्यक्षिक कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरुन कुलगुरु डॉ. पाटील मार्गदर्शन करतांना बोलत होते. या कार्यक्रमासाठी श्रीरामपूरचे उपविभागीय अधिकारी तथा कार्यकारी दंडाधिकारी अनिल पवार, तंत्र अधिकारी व उपविभागीय कृषि अधिकारी पांडुरंग साळवे, कास्ट प्रकल्पाचे प्रमुख संशोधक डॉ. सुनिल गोरंटीवार, सह प्रमुख संशोधक डॉ. मुकुंद शिंदे, विभाग प्रमुख डॉ. सचिन नलावडे, प्रगतशील शेतकरी इंद्रभान थोरात व शेतकरी उपस्थित होते. यावेळी डॉ. नलावडे यांनी उपस्थितांना ड्रोन तंत्रज्ञानाचे महत्व, गरज आणि फायदे, तोटे याबद्दल मार्गदर्शन केले. डॉ. गिरीषकुमार भणगे यांनी कांदा पिकावर ड्रोनद्वारे किटकनाशक फवारणीचे प्रात्यक्षिक दिले व उपस्थित शेतकऱ्यांच्या समस्यांचे निरसन केले.

## सुदूर संवेदन आणि भौगोलीक माहिती प्रणालीचा वापर या विषयावर ऑनलाईन अभ्यासक्रमाचे आयोजन




**दि. २ फेब्रुवारी, २०२२.** सुदूर संवेदन आणि भौगोलीक माहिती प्रणालीचा उपयोग पर्जन्य जमिनीचा प्रकार, पाण्याची उपलब्धता आणि पीक पध्दतीच्या माहितीचे विश्लेषण करण्यासाठी महत्वाचा ठरतो तसेच लॅन्डस्केप आधारीत नियोजन अतिशय अचूक आणि कमी वेळेत पूर्ण करता येते. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कार्यक्रमासाठी तसेच सर्व आंतरराष्ट्रीय संस्था सुदूर संवेदन, भौगोलीक माहिती आणि जी.आय.एस. प्रणाली हे निरिक्षण आणि नियोजनासाठी अत्यंत कार्यक्षम साधन आहे म्हणून सुदूर संवेदन आणि भौगोलीक माहिती प्रणालीचा वापर नैसर्गीक संसाधन व्यवस्थापनासाठी वापर करणे काळाची गरज आहे असे प्रतिपादन नवी दिल्ली येथील जी.आय.झेड. (प्रोसॉईल) चे मृदा संरक्षक व वरिष्ठ सल्लागार डॉ. इंद्रनील घोष यांनी केले. महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथे जागतीक बँक अर्थसहाय्यीत भारतीय कृषि अनुसंधान परिषद राष्ट्रीय कृषि उच्च शिक्षण प्रकल्प, नवी दिल्ली पुरस्कृत हवामान अद्ययावत शेती व जलव्यवस्थापन प्रकल्प कार्यरत असून कास्ट प्रकल्प, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी व प्रोसॉईल प्रकल्प यांच्या संयुक्त विद्यमाने नैसर्गीक संसाधन व्यवस्थापनासाठी सुदूर संवेदन व भौगोलीक माहिती प्रणालीचा वापर या विषयावरील तीन आठवड्याचा राष्ट्रीय प्रमाणपत्र अभ्यासक्रम आयोजीत केला होता. या अभ्यासक्रमाच्या समारोपाच्या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणुन डॉ. इंद्रनील घोष बोलत होते. याप्रसंगी अधिष्ठाता डॉ. प्रमोद रसाळ, कास्ट प्रकल्पाचे प्रमुख संशोधक डॉ. सुनिल गोरंटीवार, सहसंशोधक डॉ. मुकुंद शिंदे, प्रमाणपत्र अभ्यासक्रमाचे आयोजक डॉ. सुनिल कदम तसेच सहआयोजक डॉ. भाऊ गावीत उपस्थित होते.

याप्रसंगी प्रमुख पाहुण्यांचे स्वागत व प्रास्ताविक डॉ. प्रमोद रसाळ यांनी केले. डॉ. सुनिल गोरंटीवार यांनी कास्ट प्रकल्पाद्वारे आतापर्यंत घेतलेल्या प्रशिक्षण कार्यक्रमांचा आढावा सादर केला. डॉ. सुनिल कदम यांनी तीन आठवड्याच्या प्रमाणपत्र अभ्यासक्रमाचा आढावा सादर केला. यावेळी डॉ. अरुंधती व निलेश भावे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. वैभव मालुंजकर व इंजि. कल्पेश बोरसे यांनी केले तर आभार डॉ. भाऊ गावीत यांनी मानले. या प्रशिक्षण कार्यक्रमाचे समन्वयक म्हणुन डॉ. चैतन्य पांडे, डॉ. अक्षय कुमार आणि इंजि. मोहसीन तांबोळी यांनी काम पाहिले. या कार्यक्रमासाठी विद्यापीठ कार्यक्षेत्रातील महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता तसेच विभाग प्रमुख, शास्त्रज्ञ व कर्मचारी ऑनलाईन उपस्थित होते.

मफुकृवि ई वार्ता
फेब्रुवारी २०२२

## ड्रोनद्वारे पिकांवरील औषध फवारणीचे प्रात्यक्षिक




**दि. १६ फेब्रुवारी, २०२२.** भारतीय शेतीमध्ये आतापर्यंत बरीच प्रगती झाली आहे. शेतकऱ्यांनी संशोधन व नविन तंत्रज्ञानाचा अवलंब केल्यामुळे त्यांना फायदा झाला आहे. शेतीमध्ये औषध फवारणी करतांना ड्रोन महत्वाचा घटक ठरणार आहे. पिकांचे किडींपासून संरक्षण करण्यासाठी औषध फवारणी करणे गरजेचे असते. त्याचबरोबर विविध अन्नद्रव्य पिकांवर फवारावे लागतात. या सर्व कामासाठी मनुष्यबळाची गरज असते. यावेळी ड्रोनचा वापर झाल्यास औषध फवारणी फायदेशीर होईल असे प्रतिपादन महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे अधिष्ठाता डॉ. प्रमोद रसाळ यांनी केले. श्रीरामपूर तालुक्यातील माळवडगाव या ठिकाणी ड्रोनद्वारे औषध फवारणीचे प्रात्यक्षिक आयोजीत करण्यात आले होते. यावेळी डॉ. रसाळ बोलत होते. याप्रसंगी प्रकल्प समन्वयक डॉ. सुनिल गोरंटीवार, आंतरविद्या जलसिंचन व्यवस्थापन विभाग प्रमुख डॉ. महानंद माने, प्रकल्प सहसमन्वयक डॉ. मुकुंद शिंदे, कृषि अभियांत्रिकी विभागाचे प्रमुख डॉ. सचिन नलावडे, कृषि अभियांत्रिकी माजी विद्यार्थी संघटनेचे सदस्य तसेच अमेरिकास्थित आय.टी. प्रोफेशनल इंजि. किशोर गोरे, इफको कंपनीचे अधिकारी व शेतकरी शास्त्रज्ञ मंचाचे अध्यक्ष श्री. बापुसाहेब उंडे उपस्थित होते. यावेळी डॉ. गोरंटीवार यांनी कास्ट प्रकल्पांतर्गत ड्रोन विषयावर प्रशिक्षण कार्यक्रम आयोजीत करणार असल्याचे जाहिर केले. या फवारणी प्रात्यक्षिकाचे आयोजन हवामान अद्ययावत शेती व जल व्यवस्थापनाचे आधुनिक कृषि विज्ञान व तंत्रज्ञान केंद्र आणि आंतरविद्या शाखा जलसिंचन व्यवस्थापन विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने शेतकरी शास्त्रज्ञ मंत्र यांच्याकरीता इफको नॅनो युरीया व सागरीका ड्रोनद्वारे करण्यात आले. प्रात्यक्षिक पाहाण्यासाठी शेतकरी शास्त्रज्ञ मंचाचे सर्व शेतकरी उपस्थित होते. यावेळी डॉ. सचिन नलावडे, इंजि. योगश दिघे व डॉ. गिरीषकुमार भणगे यांनी ड्रोन प्रात्यक्षिक शेतकऱ्यांना दाखविले.

मफुकृवि ई वार्ता

फेब्रुवारी २०२२



## शेतकऱ्यांसाठी ड्रोनद्वारे फवारणीचे प्रात्यक्षिकाचे आयोजन



**दि. १८ फेब्रुवारी, २०२२.** विविध क्षेत्रात ड्रोनचा उपयोग वाढतो आहे. कृषि क्षेत्रात डिजिटल तंत्रज्ञानाच्या वापरास गेल्या पाच–सहा वर्षापासून सुरूवात झाली आहे. ड्रोनची मदत घेऊन कीटकनाशक व द्रवरूप खते फवारणीच्या प्रयोगांना आता केंद्र सरकारच्या नव्या योजना आणि कार्यपद्धती विषयक नियमांवली मुळे प्रोत्साहन मिळाले आहे. फवारणीमुळे कीटकनाशकांच्या वापरात ५० टक्क्यांपेक्षा अधिकची बचत तसेच पाण्याचे व पीक फवारणीसाठी लागणारे मनुष्यबळ नक्कीच कमी होईल असा विश्वास माजी खासदार श्री. प्रसाद तनपुरे यांनी व्यक्त केला. शेतकऱ्यांनी एकत्र येऊन गटा–गटाने ड्रोन खरेदी करून त्याच्या सहाय्याने फवारणीचे काम केल्यास आपल्या पिकाचा उत्पादन खर्च कमी होईल आणि उत्पन्न वाढेल. तनपुरेवाडी, राहुरी येथील शेतकऱ्यांसाठी ड्रोनच्याद्वारे फवारणीचे प्रात्यक्षिक श्री. तनपुरे आणि कृषि विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. पी.जी. पाटील यांच्या पुढाकाराने महात्मा फुले कृषि विद्यापीठातील कास्ट प्रकल्पामार्फत घेण्यात आले. या प्रात्यक्षिकासाठी माजी खासदार प्रसाद तनपुरे, कृषि यंत्र उद्योजक श्री. दत्तात्रय कवाने तसेच परिसरातील शेतकरी उपस्थित होते. यावेळी कृषि यंत्रे आणि शक्ती विभागाचे प्रमुख डॉ. सचिन नलावडे यांनी शेतकऱ्यांना ड्रोन तंत्रज्ञानाबद्दल माहिती दिली व फायदे तसेच तोटे समजावून सांगितले आणि त्यांच्या शंकांचे निरसन केले तसेच केंद्र सरकारच्या अनुदान योजनेबाबत माहिती दिली. डॉ. सचिन नलावडे आणि डॉ. गिरीशकुमार भणगे यांनी शेतकऱ्यांना कांदा पिकावर कीटकनाशक फवारणीचे प्रात्यक्षिक दिले.

मफुकृवि ई वार्ता
फेब्रुवारी २०२२

## महात्मा फुले कृषि विद्यापीठात शिवजयंती उत्साहात साजरी



**दि. १९ फेब्रुवारी, २०२२.** महात्मा फुले कृषि विद्यापीठात शिवजयंती साजरी करण्यात आली. याप्रसंगी प्रशासकीय इमारतीमध्ये आयोजित कार्यक्रमात कुलगुरू डॉ. पी. जी. पाटील यांनी शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन केले. यावेळी अधिष्ठाता (कृषि) डॉ. प्रमोद रसाळ, नियंत्रक श्री. सुखदेव बलमे, विभाग प्रमुख डॉ. बापूसाहेब भाकरे, डॉ. के.जे. कांबळे, विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ. महावीरसिंग चौहाण, क्रीडा अधिकारी प्रा. दिलीप गायकवाड, प्रसारण अधिकारी डॉ. पंडित खर्डे, मा. कुलगुरुंचे तांत्रिक अधिकारी डॉ. पवन कुलवाल, सुरक्षा अधिकारी श्री. गोरक्ष शेटे उपस्थित होते. यावेळी छत्रपती शिवाजी महाराजांविषयी विचार मांडताना कुलगुरू डॉ. पी.जी. पाटील म्हणाले स्वराज्य स्थापनेसाठी महाराजांना जिजाऊंचे बाळकडू मिळाले. त्यांच्या सैन्यात सर्व जाती, धर्मातले लोक होते. प्रचंड इच्छाशक्ती आणि गनिमी कावाचा वापर करत त्यांनी स्वराज्याचा झेंडा अटकेपार नेला. महाराजांच्या याच गनिमी काव्याचा वापर व्हियतनाम देशाने करून अमेरिकेसारख्या बलाढ्य देशाला वीस वर्ष झुंजविले. रयतेच्या राजा, लोक कल्याणकारी राजा आणि एक आदर्श राजा हे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या पैलू होते. शेतकऱ्यांविषयी त्यांना विशेष जिव्हाळा होता. अशा या थोर व्यक्तिमत्त्वाचे विचार आपण आचरणात आणावे असे आवाहन कुलगुरू डॉ. पाटील यांनी केले. याप्रसंगी अधिष्ठाता (कृषि) डॉ. प्रमोद रसाळ, डॉ.महावीरसिंग चौहाण, डॉ. पंडित खर्डे आणि विद्यार्थी यांनी आपले विचार मांडले. कार्यक्रमाला शास्त्रज्ञ आणि कर्मचारी उपस्थित होते.

वर्ष :२, अंक क्रं. : १४, फेब्रुवारी, २०२२ महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

## गांडुळखत निर्मितीवर प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन




**दि. १५ फेब्रुवारी, २०२२.** व्यवसाय करतांना गुणवत्ता जपणे अत्यंत महत्वाचे आहे. व्यवसायाकडे व्यवसाय म्हणुन पहा व रोजगार निर्मिती करा. व्यावसायिक दृष्टीकोन ठेवून गांडूळ खत निर्मिती करणे गरजेचे असल्याचे प्रतिपादन महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे अधिष्ठाता डॉ. प्रमोद रसाळ यांनी केले. महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथील पदव्युत्तर महाविद्यालयातील कृषि विस्तार व संज्ञापन विभागाच्या वतीने शाश्वत उत्पादन व उत्पन्न वृध्दीसाठी गांडुळखत निर्मिती या विषयावर एक दिवसीय प्रशिक्षण वर्गाचे आयोजन करण्यात आले होते. या वर्गाच्या उद्‌घाटन प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणुन डॉ. रसाळ बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कृषि महाविद्यालय, हळगावचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. मिलिंद अहिरे उपस्थित होते. याप्रसंगी अध्यक्षस्थानावरुन बोलतांना डॉ. अहिरे म्हणाले की कौशल्याचा धागा पकडून प्रगती केली पाहिजे. सेंद्रिय अन्न निर्मितीसाठी गांडूळखताचा वापर करणे गरजेचे आहे. गांडूळखत निर्मिती करुन उद्योजक बना असे आवाहन त्यांनी यावेळी केले. तांत्रिक सत्रात डॉ. संदिप लांडगे यांनी गांडूळ खत निर्मिती यावर मार्गदर्शन केले. डॉ. महेंद्र मोटे यांनी गांडूळ खत कसे तयार करावे याचे प्रात्यक्षिक दाखविले. या प्रशिक्षणासाठी राहुरी तालुक्यातील डिग्रस, गोटुंबे आखाडा, सडे, बाभुळगाव या गावातील प्रशिक्षणार्थी उपस्थित होते. यावेळी प्रशिक्षणार्थींना प्रमाणपत्र व गांडूळ खताच्या बेडचे वाटप करण्यात आले. प्रास्ताविक डॉ. गोरक्ष ससाणे यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. आनंद चवई यांनी तर आभार डॉ. ज्ञानदेव फराटे यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी डॉ. मनोहर धादवड, श्री. राजु राठोड, श्री. विश्वनाथ तोंडे व श्री. अनिल येवले यांनी विशेष परिश्रम घेतले.

मफुकृवि ई वार्ता
फेब्रुवारी २०२२
वर्ष :२, अंक क्रं. : १४, फेब्रुवारी, २०२२ महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

## जागतिक कडधान्य दिन साजरा




**दि. १० फेब्रुवारी, २०२२.** महात्मा फुले कृषि विद्यापीठाने विकसीत केलेल्या कडधान्य पिकांच्या सुधारीत वाणांमुळे महाराष्ट्रातीलच नाही तर देशातील कडधान्ये उत्पादक शेतक–यांचे उत्पन्न वाढून विकास होण्यास हातभार लागलेला आहे असे प्रतिपादन कडधान्य सुधार प्रकल्पाचे प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. नंदकुमार कुटे यांनी केले. कडधान्य सुधार प्रकल्प येथे जागतिक कडधान्य दीन व आजादी का अमृत महोत्सव अंतर्गत कडधान्य सुधार प्रकल्प व पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर कृषि महाविद्यालय, हळगांव यांच्या संयुक्त विद्यमाने जागतीक कडधान्य दिन साजरा करण्यात आला. त्यावेळी उपस्थित शेतकऱ्यांना व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना डॉ. कुटे यांनी व्यक्त केले. तूर किटकशास्त्रज्ञ प्रा. चांगदेव वायळ यांनी कडधान्य पिकांवरील किडी व रोगांचे प्रभावीपणे नियंत्रण करण्यासाठी एकात्मिक कीड व रोग व्यवस्थापन या पध्दतीचा अवलंब करुन कडधान्ये पिकांवरील किडी व रोगांचे नियंत्रण करावे याबाबतची सविस्तर माहिती दिली. याप्रसंगी कडधान्य सुधार प्रकल्पातील प्रायोगीक प्रक्षेत्राला भेट देवून शेतकरी व विद्यार्थ्यांना येथे चाललेल्या संशोधनाबाबत डॉ. मनाजी शिंदे व डॉ. विवेकानंद कुलकर्णी यांनी सविस्तर माहिती दिली. यावेळी तांभेरे येथील भा.कृ.अ.प. शेतकरी प्रथम प्रकल्पाचे प्रगतीशिल शेतकरी ताराचंद गागरे यांनी आणि पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर कृषि महाविद्यालय, हळगांव येथील विद्यार्थी महेश भुसारे व कु. कादंबरी सोनवणे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी हरभरा पैदासकार डॉ.मनाजी शिंदे, मका पैदासकार डॉ. सोमनाथ धोंडे, रोगशास्त्रज्ञ डॉ. विश्वास चव्हाण, डॉ. सुदर्शन लटके, डॉ. विवेकानंद कुलकर्णी हे उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. शिर्के हिने केले तर आभार महाविद्यालयाचे सहयोगी प्राध्यापक डॉ. चारुदत्त चौधरी यांने केले. याप्रसंगी महाविद्यालयातील शिक्षक डॉ. प्रेरणा भोसले, डॉ. मनोज गुड व प्रा. किर्ती भांगरे हे उपस्थित होते. तसेच डी.बी.टी. प्रकल्पातील डॉ. अरविंद तोत्रे, डॉ. सारीका कोहकडे आणि अक्षय पोटे यांनी कार्यक्रमाच्या नियोजनात सहभाग घेतला.

मफुकृवि ई वार्ता
फेब्रुवारी २०२२

वर्ष :२, अंक क्रं. : १४, फेब्रुवारी, २०२२ महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

## रेडिओ जॉकींसाठी प्रशिक्षण वर्गाचे आयोजन




**दि. १८ फेब्रुवारी, २०२२.** सध्या फेसबुक, व्हॉट्सअॅप, ट्वीटर, इंन्स्टाग्राम या सारखी समाज माध्यमांची संख्या माहितीच्या देवाणघेवाणीसाठी उपलब्ध आहेत. परंतु या सर्वामध्ये रेडीओचे स्थान अढळ असे आहे. स्पर्धा परिक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांपासून ग्रामीण भागातील युवक, महिला तसेच शेतकरी वर्गामध्ये आकाशवाणीच्या माध्यमातून प्रसारीत होणाऱ्या कार्यक्रमांना मोठी पसंती दिली जाते. विद्यार्थ्यांच्या जडणघडणीत व्यक्तीमत्व विकासाबरोबरच शेतकऱ्यांच्या शेतीविषयक माहितीसाठी व करमणूकीसाठी रेडिओचे योगदान महत्वाचे असल्याचे प्रतिपादन हळगाव कृषि महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. मिलिंद अहिरे यांनी केले. महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथील कृषि विस्तार व संज्ञापन विभाग व पदव्युत्तर महाविद्यालय यांचे अनुसुचित जाती विशेष पॅकेज अंतर्गत रेडीओ जॉकी संदर्भात दोन दिवसीय प्रशिक्षण वर्गाचे आयोजन करण्यात आले आहे. या प्रशिक्षण वर्गाच्या उद्घाटन कार्यक्रमात अध्यक्षीय स्थानावरुन डॉ. अहिरे बोलत होते. यावेळी विस्तार विभागाचे डॉ. गोरक्ष ससाणे, अहमदनगर आकाशवाणी केंद्राचे प्रसारण अधिकारी सुदाम बटुळे, निवेदक शशिकांत जाधव, निवेदिका सौ. विना दिघे, डॉ. सचिन सदाफळ व डॉ. ज्ञानदेव फराटे उपस्थित होते. यावेळी बटुळे आपल्या मार्गदर्शनात म्हणाले की कम्युनिटी रेडिओमुळे विद्यार्थ्यांमधील सुप्त गुणांना एक हक्काचे व्यासपीठ मिळणार आहे. या दोन दिवस चालणाऱ्या प्रशिक्षण कार्यक्रमात कोल्हापूर येथील शिवाजी विद्यापीठाचे जनसंपर्क अधिकारी डॉ. आलोक जत्राटकर, किटकशास्त्रज्ञ डॉ. नंदकुमार भुते, मुंबई आकाशवाणी केंद्राचे अधिकारी संतोष जाधव, अहमदनगर आकाशवाणी केंद्राचे निवेदक शशिकांत जाधव, निवेदिका सौ. विना दिघे, सोनई कृषि महाविद्यालयाचे प्रा. सुनिल बोरुडे, बाभळेश्वर येथील कृषि विज्ञान केंद्राच्या कम्युनिटी रेडीओच्या रुपाली घोडके यांनी मार्गदर्शन केले. या कार्यक्रमासाठी विद्यापीठातील १५० पेक्षा जास्त विद्यार्थी ऑफलाईन व ऑनलाईन पध्दतीने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. आनंद चवई यांनी तर आभार डॉ. गोरक्ष ससाणे यांनी मानले. हा प्रशिक्षण कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी डॉ. मनोहर धादवड, राजु राठोड, डॉ. पद्मकुमार पाटील व विश्वनाथ तोंडे यांनी विशेष परिश्रम घेतले.

## कृषि महाविद्यालय, धुळे येथे कृषि विस्तारात माध्यमांचे योगदान या विषयावर प्रशिक्षण संपन्न




**दि. १७ फेब्रुवारी, २०२२.** कृषि महाविद्यालय, धुळे येथे कृषि विस्तार विभागाद्वारे भारतीय कृषि अनुसंधान परिषद, नवी दिल्ली प्रायोजीत एस.सी.एस.पी. योजना उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांसाठी कृषि विस्तारात माध्यमांचे योगदान या विषयावर कृषि महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. चिंतामणी देवकर यांचे मार्गदर्शनाखाली दोन दिवसीय प्रशिक्षण संपन्न झाले. प्रशिक्षण कार्यक्रमाच्या समारोपावेळी समारोप कार्यक्रमाचे अध्यक्ष सहयोगी अधिष्ठाता डॉ. चिंतामणी देवकर यांच्या हस्ते यशस्वीरित्या प्रशिक्षण पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र वितरित करण्यात आले तर प्रशिक्षण कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी अध्यक्षस्थानी कृषि अभियांत्रिकी विभागाचे प्राध्यापक डॉ. सोमनाथ सोनवणे आणि कृषि विस्तार विभागाचे प्राध्यापक डॉ. संदीप पाटील, महाविद्यालयाचे नोडल अधिकारी डॉ. विक्रांत भालेराव व्यासपीठावर उपस्थित होते.

या दोन दिवसीय प्रशिक्षणावेळी प्रशिक्षक आणि विषय तज्ञ म्हणून उपस्थित असलेले श्री. ललित चव्हाण, संपादक व माध्यम प्रतिनिधी यांनी विद्यार्थ्यांना लिखित माध्यमांचे महत्व आणि लेखन कौशल्य, प्रा. राजश्री सोनवणे यांनी दृक–श्राव्य माध्यमांचे महत्व आणि दूरचित्रवाणीसाठी लेखन कौशल्य, प्रा. विजय पालवे यांनी कृषि पत्रकारिता– माध्यमक्षेत्रात काम करताना घ्यावयाची काळजी, डॉ. पांडुरंग शेंडगे यांनी कृषि विपणनासाठी उपलब्ध असलेल्या विविध माध्यमांचा वापर, डॉ. संदीप पाटील यांनी कृषिमध्ये माहिती तंत्रज्ञानाचा वापर आणि प्रा. दिनेश सूर्यवंशी यांनी कृषीसाठी समाजमाध्यमांचा वापर या विषयी प्रशिक्षणार्थीना मार्गदर्शन केले. समारोप कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. चिंतामणी देवकर म्हणाले कृषि विषयक ज्ञान– तंत्रज्ञान आणि संशोधन शेतकऱ्यांपर्यंत पोहोचण्यासाठी कृषि पदवीधरांनी सोपे भाषेत वृत्तपत्रातून प्रभावी मांडणी करावी जेणेकरून कृषि विषयक तंत्रज्ञानाचा फायदा आणि वापर सर्वसामान्य शेतकऱ्यांना होऊन कृषि आणि कृषि संबंधित उद्योगांमधून भरघोस उत्पन्न आणि उत्पादन वाढण्यास मदत होईल. डॉ. सोमनाथ सोनवणे म्हणाले की, विद्यार्थ्यांनी वेळेची गरज लक्षात घेऊन वेगवेगळ्या उपलब्ध समाजमाध्यमांचा वापर करून कृषि संशोधन शेतकऱ्यांपर्यंत शेतकऱ्यांना पोहोचविले पाहिजे. डॉ. संदीप पाटील यांनी कार्यशाळा घेण्यामागील उद्देश स्पष्ट केला. प्रशिक्षण यशस्वी होण्यासाठी कृषि विस्तार विभागातील डॉ. श्रीकांत बन आणि श्री. भरत बाविस्कर यांनी महत्वपूर्ण सहकार्य केले. प्रशिक्षणावेळी कृषि महाविद्यालयातील विद्यार्थी, विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

फेब्रुवारी २०२२
मफुकृवि ई वार्ता

वर्ष :२, अंक क्र. : १४, फेब्रुवारी, २०२२ महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

## कृषि विज्ञान केंद्र, धुळे येथे तीन दिवसीय व्यापारक्षम शेळीपालन प्रशिक्षण संपन्न




**दि. १० फेब्रुवारी, २०२२.** महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी अंतर्गत कृषी विज्ञान केंद्र, धुळे व अटारी पुणे, झोन–८ यांचे संयुक्त विद्यमाने शेतकरी, पशुपालक यांची क्षमता वाढविणेकरिता किफायतशीर दुग्धव्यवसाय व पशुधन व्यवस्थापन कार्यक्रमांतर्गत तीन दिवसीय व्यापारक्षम शेळी पालन प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले होते. सदर प्रशिक्षणाच्या उदघाटन कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कृषि महाविद्यालय, धुळेचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. चिंतामणी देवकर उपस्थित होते. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणुन अश्वमेध मेडिकेयरचे प्रमुख श्री. वाकचौरे उपस्थित होते. यावेळी कृषी तंत्र विद्यालयाचे प्राचार्य डॉ. राहुल देसले, कृषी विज्ञान केंद्राचे कार्यक्रम समन्वयक डॉ. दिनेश नांद्रे, पशुसंवर्धन व दुग्ध शास्त्र विभागाचे प्रा. विपुल वसावे, मृद विज्ञान व कृषि रसायनशास्त्राचे डॉ. अतिश पाटील, पशु संवर्धन व दुग्ध शास्त्रज्ञ डॉ. धनराज चौधरी उपस्थित होते. याप्रसंगी उद्घाटनपर भाषणात डॉ. चिंतामणी देवकर यांनी कृषि अर्थव्यवस्थेमध्ये पशुधनाचे महत्व अधोरेखित केले व कृषी विज्ञान केंद्र राबवीत असलेल्या उपक्रमांचे कौतुक करून शेळीपालनाचे महत्व विषद केले. डॉ. राहुल देसले यांनी पशुधन सध्यस्थिती, भारतीय अर्थव्यवस्थेमधील पशुधन, कुक्कुटपालन, शेळीपालनाचे महत्व आणि भविष्यातील संधी या विषयी मार्गदर्शन केले. या प्रशिक्षणाचे प्रास्ताविक करतांना डॉ. दिनेश नांद्रे यांनी कृषि विज्ञान केंद्र, राबवीत असलेल्या विविध कृषि व कृषि पूरक उपक्रमांविषयी माहिती दिली. सदर प्रशिक्षणामध्ये ग्रामीण युवक, शेतकरी, महिलांनी मोठ्या संखेने सहभाग नोंदवला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. धनराज चौधरी यांनी केले तर आभार प्रदर्शन डॉ. अतिश पाटील यांनी मानले. या प्रशिक्षण कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी डॉ. पंकज पाटील, प्रा. रोहित कडू, प्रा. जगदीश काथेपुरी, कु. अमृता राऊत, श्री. जयराम गावित, कु. प्राची काळे, कु. स्वप्नाली कौटे, श्री. स्वप्नील महाजन, श्री. बाळू वाघ, श्री. कुमार भोये, श्री. मधुसूदन अहिरे यांचे सहकार्य लाभले.

## कृषि महाविद्यालय, धुळे येथे शिवजयंती उत्साहात साजरी





**दि. १९ फेब्रुवारी २०२२.** कृषि महाविद्यालय, धुळे येथे शिवजयंती उत्साहात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमास प्रमुख वक्ते म्हणून व्यवसायाने डॉक्टर असलेले आणि शिवचरित्राचे अभ्यासक चाळीसगाव येथील डॉ. शुभम डोंगरे उपस्थित होते. कृषि महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. चिंतामणी देवकर, विद्यार्थी परिषद उपाध्यक्ष आणि प्राध्यापक कृषि अभियांत्रिकी डॉ. सोमनाथ सोनवणे, विद्यार्थी कल्याण अधिकारी प्रा. जितेंद्र सूर्यवंशी, तंत्र अधिकारी डॉ. संदीप पाटील, एनएसएस कार्यक्रम अधिकारी डॉ. सुनील पाटील हे व्यासपीठावर उपस्थित होते.

धुळे येथील शिवतीर्थावरील छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्यास अभिवादन आणि पूजन करून महाविद्यालयातील प्राध्यापकांच्या उपस्थितीत विद्यार्थी आणि विद्यार्थिनी यांचेद्वारा शिवतीर्थपासून ज्योत प्रज्वलीत करून सुरू झालेल्या भव्य मिरवणुकीचे स्वागत डॉ. चिंतामणी देवकर यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. सोमनाथ सोनवणे यांनी केले. यावेळी प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित असलेले डॉ. शुभम डोंगरे यांनी छत्रपती शिवाजीराजांच्या कार्याची महती सांगताना, राजांच्या जीवनातील विविध महत्त्वपूर्ण प्रसंगांचे यथार्थवर्णन करून महाराजाद्वारा अंगीकारलेल्या रयतेचे राज्य आणि सुशासन यावरही ऊहापोह केला. कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. चिंतामणी देवकर म्हणाले की प्रत्येक विद्यार्थ्याने शिवाजी

महाराजांसारखे गुण अंगीकारून आपल्या जीवनातील ध्येय गाठले पाहिजे. कार्यक्रमास महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, अधिकारी, कर्मचारी, विद्यार्थी, विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्यार्थी रोहित गायकवाड आणि कु. भारती उदमले यांनी तर आभार प्रदर्शन प्रा. जितेंद्र सूर्यवंशी यांनी केले.

## राष्ट्रीय सेवा योजनेमार्फत पुणे कृषि महाविद्यालयात व्याख्यानाचे आयोजन

**दि. १० फेब्रुवारी २०२२.** समाजामध्ये अनेक अपप्रवृत्ती आपल्या अविवेकी वर्तनाने समाजाचे स्वास्थ बिघडविण्याचे काम करीत असतात. यामुळे समाजमन कलुशीत होते. अशाप्रकारची अविवेकी वृत्ती असणाऱ्या व्यक्तींना वेळीच विरोध करायला हवा. यासाठी प्रत्येकाने समाजातील अविवेकी वर्तनाविरोधात लढा देण्यासाठी सक्षम व्हायला हवे असे प्रतिपादन पुणे जिल्ह्यातील चाकण येथील सहाय्यक पोलीस आयुक्त श्रीमती प्रेरणा कट्टे पाटील यांनी केले. कृषि महाविद्यालय, पुणे येथे राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून व भारतीय कृषि अनुसंधान व संशोधन परिषद, नवी दिल्ली यांचे आर्थिक सहाय्याने अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती खास योजनेअंतर्गत व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मार्गदर्शन करतांना श्रीमती कट्टे बोलत होत्या. आपल्या अध्यक्षीय भाषणात सहयोगी अधिष्ठाता डॉ. सुनील मासळकर यांनी विद्यार्थ्यांनी सदसद्विवेकबुद्धीचा वापर करून स्वमूल्यमापन करावे आणि जीवनासमोर स्पष्ट ध्येय ठेवून वाटचाल करत असतानाच पर्यायी मार्गसुध्दा ठेवावेत असे सांगितले. या कार्यक्रमास विद्यार्थी परिषदेचे उपाध्यक्ष डॉ. अरुण कांबळे, विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ. प्रमोद पाटील, विद्यार्थी नेमणुका कक्षाच्या अधिकारी डॉ. लीना शितोळे, राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक व कार्यक्रम अधिकारी, महाविद्यालयाचे विद्यार्थी व कर्मचारी मोठ्या संख्येने ऑनलाईन उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. प्रमोद पाटील यांनी केले. सूत्रसंचालन व आभार श्री. अनिकेत वाकळे व कु. ऋतुजा भोसले या स्वयंसेवकांनी केले. या कार्यक्रमाच्या आयोजनासाठी कु. मीनल निम्हण, कु. शिल्पा गायकवाड, श्री. ऋषिकेश होळकर, श्री. धैर्यशील कांबळे श्री. कार्तिक पोकळे, कु. श्रीया माने, श्री. श्रीराज कोलते या विद्यार्थी स्वयंसेवकांनी विशेष परिश्रम घेतले.

## हळगाव कृषि महाविद्यालयात शिवजयंती उत्साहात साजरी



**दि. १९ फेब्रुवारी, २०२२.** भारतीय आरमाराचे पहिले जनक हे छत्रपती शिवाजी महाराज होते. महाराजांनी जिंकलेल्या सर्व किल्ल्यांचे संवर्धन केले पाहिजे. शिवाजी महाराजांचे विचार आपल्या पिढीने आत्मसात केल्यास आपली प्रगती होऊ शकते असे प्रतिपादन हळगाव कृषि महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. मिलिंद अहिरे यांनी केले. भारतीय स्वातंत्र्याच्या

अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथील पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर कृषि महाविद्यालय, हळगाव येथे राष्ट्रीय सेवा योजनेमार्फत छत्रपती शिवाजी महाराज जयंती ऑनलाइन पद्धतीने साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या सुरूवातीला छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. कार्यक्रमाचे स्वागत कृषि महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेची स्वयंसेविका कु. आश्लेषा डमारे तर सूत्रसंचालन महेश जाधव याने केले. प्रास्ताविक कार्यक्रम अधिकारी प्रा. किर्ती भांगरे यांनी केले. कु. प्रजाली गोसावी, कु. मंजिरी पाटील, कु. अक्षय गुंजाळ यांनी आपले मनोगत व्यक्त केले. आभार रोहित लोहकरे याने मानले. यावेळी कृषि महाविद्यालयाचे डॉ. प्रेरणा भोसले, डॉ. मनोज गुड, सर्व शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थी व विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## महात्मा फुले कृषि विद्यापीठातील शास्त्रज्ञांच्या टोमॅटो उत्पादक शेतकऱ्यांच्या शेतावर भेटी व मार्गदर्शन






**दि. ३ फेब्रुवारी, २०२२.** अहमदनगर जिल्ह्यातील अकोले व संगमनेर येथील तालुका कृषि अधिकारी, कृषि विभाग, महाराष्ट्र

शासन यांनी टोमॅटो उत्पादक शेतकऱ्यांच्या शेतावर भेटी आयोजित केल्या होत्या. त्या अनुषंगाने महात्मा फुले कृषि विद्यापीठातील कृषि तंत्रज्ञान माहिती केंद्राचे व्यवस्थापक डॉ. दत्तात्रय पाचरणे, टोमॅटो प्रकल्पाचे प्रमुख डॉ. अनिकेत चंदनशिवे, भाजीपाला पिके तज्ञ प्रा. अन्सार अत्तार, किटकशास्त्रज्ञ डॉ. सोमनाथ पवार व हॉर्ट्सप प्रकल्पाचे संशोधन सहयोगी डॉ. नंदलाल देशमुख यांनी अकोले तालुक्यातील कळस बुद्रुक व संगमनेर तालुक्यातील निमज या गावातील टोमॅटो उत्पादक शेतकऱ्यांच्या शेताला भेटी दिल्या. भेटी दरम्यान असे निदर्शनास आले की, रब्बी हंगामात लागवड केलेल्या टोमॅटोची तोडणी सुरू झालेली आहे तसेच काही प्रक्षेत्रांची तोडणी सुरू होणार आहे. त्याच बरोबर काही शेतकरी उन्हाळी हंगामासाठी टोमॅटो लागवडीची तयारी करत आहेत. प्रक्षेत्र भेटी दरम्यान असेही निदर्शनास आले की काही शेतकऱ्यांच्या टोमॅटो पिकावर रसशोषण करणाऱ्या किडींचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात दिसून येत आहे. त्यामध्ये मावा, फुलकिडे, तुडतुडे, पांढरी माशी व टूटा नागअळी या किडींचा प्रादुर्भाव प्रामुख्याने दिसून येत आहे. त्या अनुषंगाने कीड व रोगाच्या एकात्मिक नियंत्रणासाठी विद्यापीठातील शास्त्रज्ञांनी शेतकऱ्यांना सखोल असे मार्गदर्शन केले. या भेटी दरम्यान अकोले तालुक्याचे तालुका कृषि अधिकारी श्री. हासे साहेब, संगमनेर तालुक्याचे तालुका कृषि अधिकारी श्री. गोसावी साहेब व त्यांच्या विभागाचे कृषि अधिकारी उपस्थित होते. भेटी दरम्यान कृषि विद्यापीठाचे शास्त्रज्ञ, कृषि विभागाचे अधिकारी व टोमॅटो उत्पादक शेतकरी यांच्यामध्ये सविस्तर चर्चा झाली व चर्चे दरम्यान शेतकऱ्याच्या शंकांचे निरसन करून टोमॅटोच्या अधिक उत्पादनासाठी सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. सदर प्रक्षेत्र भेटीसाठी कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील, संशोधन संचालक डॉ. शरद गडाख, तसेच हॉर्टसॅप प्रकल्पाचे प्रमुख डॉ. तानाजी नरुटे व समन्वयक डॉ. संजय कोळसे यांचे मार्गदर्शन लाभले.

## संत गाडगेबाबा यांची जयंती साजरी

**दि. २३ फेब्रुवारी, २०२२.** गाडगेबाबा हे फक्त संत नव्हते तर ते एक मोठे समाजसुधारक होते. त्यांच्या हयातीत गाडगेबाबा यांनी स्वच्छतेविषयी समाजामध्ये जागृती निर्माण केली. रूढी व अंधश्रद्धा नष्ट करण्याचे मोठे कार्य संत गाडगेबाबा यांनी केले. स्वच्छतेची शिकवण प्रत्येकाने आपल्या आचरणात आणल्यास व त्याची सुरुवात आपल्या घरापासून केल्यास आपले राज्य व संपूर्ण देश स्वच्छ होईल असे प्रतिपादन हाळगाव कृषि महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. मिलिंद अहिरे यांनी केले. आजादी का अमृत महोत्सव अंतर्गत विद्यार्थी कल्याण अधिकारी व राष्ट्रीय सेवा योजना यांच्यावतीने स्वच्छ भारत अभियान व संत गाडगेबाबा जयंतीनिमित्त महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कृषि महाविद्यालय, हाळगाव या महाविद्यालयातील विद्यार्थी व विद्यार्थिनी वसतिगृहात स्वच्छता कार्यक्रम राबविण्यात आला. यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन करताना डॉ. अहिरे बोलत होते. यावेळी महाविद्यालयाची विद्यार्थिनी कु. वैष्णवी ठाकूर हिने मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ. सखेचंद अनारसे यांनी केले तर उपस्थितांचे आभार डॉ. मनोज गुड यांनी मानले. या कार्यक्रमाला महाविद्यालयाचे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

## फळे व भाजीपाला प्रक्रिया या विषयावर प्रशिक्षणाचे आयोजन

**दि. २४ फेब्रुवारी, २०२२.** फळे व भाजीपाला उत्पादनात भारत अग्रेसर आहे. परंतू काढणीपश्चात हाताळणी, वाहतूक, साठवणूकअभावी ३० ते ४० टक्के भाजीपाला वाया जातो. फळे आणि भाजीपाला प्रक्रियेबाबत महात्मा फुले कृषि विद्यापीठाने विकसीत केलेले तंत्रज्ञान महिलांनी प्रशिक्षणातून अवगत करुन उद्योजक व्हाव्यात असे प्रतिपादन पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कृषि महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. मिलिंद अहिरे यांनी केले. कृषि विस्तार व संज्ञापन विभाग व पदव्युत्तर महाविद्यालय, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी यांचे वतीने भारतीय कृषि अनुसंधान परिषद, नवी दिल्लीद्वारा अनुसुचित जाती उपघटक अनुदानित दोन दिवसीय फळे व भाजीपाला प्रशिक्षण कार्यक्रमात अध्यक्षीय मार्गदर्शन

मफुकृवि ई वार्ता
फेब्रुवारी २०२२

करतांना डॉ. अहिरे बोलत होते. याप्रसंगी प्राध्यापक डॉ. गोरक्ष ससाणे, सहाय्यक प्राध्यापक डॉ. ज्ञानदेव फराटे व्यासपीठावर उपस्थित होते. प्रशिक्षणाचे प्रास्ताविक डॉ. ज्ञानदेव फराटे यांनी केले. प्रशिक्षणास सडे, गोटुंबा आखाडा व परिसरातील महिला उपस्थित होत्या. सूत्रसंचालन व आभार डॉ. आनंद चवई यांनी केले. दोन दिवसीय प्रशिक्षणात सहयोगी प्राध्यापक डॉ. विक्रम कड व काढणीपश्चात तंत्रज्ञान केंद्राचे सहयोगी प्राध्यापक डॉ. जितेंद्र ढेमरे यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमासाठी राजु राठोड, विश्वनाथ तोंडे व अनिल येवले यांनी परिश्रम घेतले.

## पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर कृषि महाविद्यालयात पहिल्या विद्यार्थी परिषदेची स्थापना



**दि. २४ फेब्रुवारी, २०२२.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथील पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर कृषि महाविद्यालय, हळगाव या महाविद्यालयात पहिल्या विद्यार्थी परिषदेची स्थापना करण्यात आली. या पहिल्या विद्यार्थी परिषदेच्या चेअरमनपदी महाविद्यालयाच्या तिसऱ्या वर्षाची विद्यार्थिनी कु. मयुरी गुंजाळ हिची निवड करण्यात आली. विद्यार्थी परिषदेमध्ये प्रतिनिधीपदी तिसऱ्या वर्षाचे गोविंद भराड, वैष्णवी कासार, वैभव पवार, शिवम विरकर, दुसऱ्या वर्षाचे अमेय बागळे, श्रद्धा जगताप, संचिता नवले, अश्रफअली शेख, सोनाली धुळगंड तसेच प्रथम वर्षाचे एकता देशमुख, अक्षता जामदार, हर्षदा पाटील व अदिती साळुंखे यांची निवड झाली. या सर्व निवडी गुणवत्तेवर करण्यात आल्या. स्वीकृत सदस्यपदी राष्ट्रीय सेवा योजना व क्रीडा प्रतिनिधीपदी अनुक्रमे महेश जाधव व अजिंक्य साबळे यांची निवड झाली. विद्यार्थी परिषदेच्या चेअरमन व सदस्यपदी निवड झालेल्या सर्वांचे महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता व विद्यार्थी परिषदेचे अध्यक्ष डॉ. मिलिंद आहिरे यांनी पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले व विद्यार्थी परिषदेची जबाबदारी व कामे यावर मार्गदर्शन केले. विद्यार्थी परिषदेच्या उपाध्यक्षपदी सहयोगी प्राध्यापक डॉ. चारुदत्त चौधरी यांची निवड करण्यात आली. विद्यार्थी परिषदेच्या स्थापनेमध्ये महाविद्यालयाचे विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ. सखेचंद अनारसे यानी मोलाचे योगदान दिले. या बैठकीसाठी पदव्युत्तर महाविद्यालयाचे विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ. विजयकुमार पाटील यांना निमंत्रित करण्यात आले होते. यावेळी महाविद्यालयाचे सहाय्यक कुलसचिव श्री. एकनाथ बांगर उपस्थित होते.

## ई–यंत्र प्रयोगशाळेचे उद्घाटन




**दि. २८ फेब्रुवारी, २०२२.** कृषि क्षेत्रात दिवसेंदिवस मजुरांची समस्या वाढत आहे. कृषि क्षेत्राबरोबरच कृषि क्षेत्राशी संबंधीत उद्योगांमध्ये मजुरांची आवश्यकता मोठ्या प्रमाणावर असते. यावर रोबोटिक्स तंत्रज्ञान फायदेशीर ठरु शकते. रोबोटिक्स तंत्रज्ञानातुन मजुरांच्या उपलब्धतेच्या समस्येवर मार्ग काढता येईल असे प्रतिपादन आयआयटी मुंबईच्या ई–यंत्र प्रकल्पाचे प्रमुख संशोधक प्रा. कवी आर्या यांनी केले. महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी येथील डॉ. अण्णासाहेब शिंदे कृषि अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान महाविद्यालय व आयआयटी मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने उभारण्यात आलेल्या ई–यंत्र (रोबोट प्रशिक्षण) प्रयोगशाळेचे उद्घाटन ऑनलाईन पद्धतीने प्रा. कवी आर्या यांनी केले. या प्रसंगी महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. दिलीप पवार, कास्ट प्रकल्पाचे प्रमुख संशोधक डॉ. सुनील गोरंटीवार व कृषी यंत्र व शक्ती विभाग प्रमुख डॉ. सचिन नलावडे, डॉ. अवधूत वाळुंज, डॉ गिरीषकुमार भणगे, इंजि. योगेश दिघे उपस्थित होते. यावेळी डॉ. पवार यांनी विद्यापीठातील विविध प्रकल्पांची, संशोधन व विकसित तंत्रज्ञानाची माहिती दिली. डॉ. गोरंटीवार यांनी कास्ट प्रकल्पाची व आयओटी तंत्रज्ञानाची माहिती दिली. डॉ. नलावडे यांनी ई–यंत्र लॅबबद्दल माहिती दिली.

## मार्च महिन्यातील कामांचा तपशील

### भुईमूग (उन्हाळी)

- भुईमूगाच्या उपटया वाणासाठी पेरणीनंतर ३५ व ४५ दिवसांनी दोन वेळा पिकांवर रिकामा ड्रम फिरवावा.
- उभ्या पिकांतील सुक्ष्म अन्नद्रव्यांची कमतरता भरुन काढण्यासाठी ०.५ टक्के लोह व ०.२ टक्के झिंक सल्फेट या मिश्रणाची पेरणीनंतर ३०, ५० व ७० दिवसांनी फवारणी करावी.
- पाने पोखरणाऱ्या किंवा गुंडाळणाऱ्या अळीच्या नियंत्रणासाठी क्विनॉलफॉस २५ ई.सी. २० मिली या प्रमाणात १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. पाने खाणाऱ्या अळीच्या नियंत्रणासाठी क्लोरोपायरीफॉस २०% प्रवाही १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.

### ऊस

- १६ आठवडे वयाच्या लागणीस हेक्टरी एकूण शिफारशित खतमात्रेच्या १० टक्के नत्र (३४ किलो नत्र) म्हणजेच ७४ किलो निम कोटेड युरीया खताचा तिसरा हप्ता द्यावा.
- पक्क्या भरणीयोग्य वाढलेल्या २० आठवडे वयाच्या उसात आंतरपीके घेतली असल्यास त्यांची परिस्थिती पाहून काढणी करा अथवा सरीतच दाबून भरणीची तयारी करा. यावेळी नांगरीच्या सहाय्याने सरीचे वरंबे फोडून बाकी राहिलेली रासायनिक खतांची मात्रा ४० टक्के (१३६ किलो नत्र) म्हणजेच २९५ किलो युरीया ५० टक्के स्फुरद व पालाश (प्रत्येकी ८५ किलो) म्हणजेच ५३१ किलो सिंगल सुपर फॉस्फेट आणि १४२ किलो म्युरेट ऑफ पोटॅश एकत्र चांगले मिसळून हेक्टरी एकूण सऱ्यांच्या संख्येत विभागून रिजरने भरणी करावी व रानबांधणी करून लगेच पाणी द्यावे.
- आवश्यकतेनुसार जमिनीचा मगदुर आणि जमिनीतील ओलावा पाहून ८ ते १० दिवसाच्या अंतराने नियमित पाणीपुरवठा करावा.
- ठिबक सिंचनाची सोय असल्यास १० ते २० आठवडयापर्यंत उसाच्या वाढीच्या अवस्थेनुसार प्रति हेक्टरी ९ किलो नत्र, ५ किलो स्फुरद व ३ किलो पालाश पाण्यात विरघळणारे ही अन्नद्रव्ये सात दिवसांच्या अंतराने अकरा समान हप्त्यात विभागून ठिबक सिंचन प्रणालीमधून द्यावीत.
- सुरु उसाची लागण झालेल्या क्षेत्रावर उगवण विरळ झाली असल्यास त्या ठिकाणी लागणीच्या वेळी प्लॅस्टिक पिशवीत अथवा गादी वाफ्यावर वाढवलेली समवयस्क रोपे वापरून नांग्या भरून घ्याव्यात व त्वरीत हलके पाणी द्यावे.
- खोड किडीच्या नियंत्रणासाठी ऊस लागणीनंतर ४५ दिवसांनी उसाची बाळ बांधणी करावी. उसात मका, ज्वारी ही आंतरपिके न घेता, कोथिंबीर व पालक ही आंतरपिके घ्यावीत. खोडकीडग्रस्त ऊस देठ मुळासह उपटून अळीसह नष्ट करावा. हेक्टरी ५ फुले ट्रायकोकार्ड १० दिवसाच्या अंतराने ३ वेळा लावावीत. खोड किडीच्या प्रादुर्भावामुळे उसाचे शेंडे वाळत असतील तर आवश्यकता असल्यास क्लोरॅनट्रॅनिलीप्रोल ०.४% दाणेदार हे औषध १८.७५ किलो अथवा फिप्रोनिल ०.३% दाणेदार हे औषध २५ ते ३० किलो प्रति हेक्टरी या प्रमाणात वापरावे.
- ६ ते ८ आठवडे वयाच्या सुरु उसाला नत्र खताचा दुसरा हप्ता ४० टक्के नत्र (१०० किलो नत्र) म्हणजेच हेक्टरी २१७ किलो युरिया आणि १२ आठवडे वयाच्या सुरु उसाला नत्र खताचा तिसरा हप्ता १० टक्के नत्र (२५ किलो नत्र) म्हणजेच हेक्टरी ५५ किलो युरिया ६:१ या प्रमाणात निंबोळी पेंडीबरोबर मिसळून समप्रमाणात विभागून द्यावा व दुसऱ्या दिवशी हलकेसे पाणी द्यावे. तसेच आवश्यकतेनुसार जमिनीतील ओल पाहून ८ ते १० दिवसाच्या अंतराने पाण्याच्या पाळया द्याव्यात.
- ठिबक सिंचनाची सोय असल्यास डिसेंबरमध्ये लागण केलेल्या उसाकरीता वाढीच्या अवस्थेनुसार प्रति हेक्टरी ९ किलो

नत्र, ५ किलो स्फुरद व ३ किलो पालाश पाण्यात विरघळणारे हि अन्नद्रव्ये सात दिवसांच्या अंतराने अकरा समान हप्त्यात विभागून ठिबक सिंचन प्रणालीमधून द्यावीत. जानेवारीमध्ये लागण केलेल्या उसाकरीता वाढीच्या अवस्थेनुसार प्रति हेक्टरी १४.० किलो नत्र, ६.५ किलो स्फुरद व ३.० किलो पालाश हि अन्नद्रव्ये सात दिवसांच्या अंतराने पाच समान हप्त्यात विभागून ठिबक सिंचन प्रणालीमधून द्यावीत. फेब्रुवारीमध्ये लागण केलेल्या उसाकरीता वाढीच्या अवस्थेनुसार प्रति हेक्टरी ७.५ किलो नत्र, २.५ किलो स्फुरद व २.५ किलो पालाश हि अन्नद्रव्ये सात दिवसांच्या अंतराने चार समान हप्त्यात विभागून ठिबक सिंचन प्रणालीमधून द्यावीत.

### गहू

- पीक तयार होताच वेळेवर कापणी करावी. काही जातींचे दाणे शेतात झडतात. त्यामुळे बरेच नुकसान होते. म्हणून पीक पक्व होण्याच्या २ ते ३ दिवस अगोदर कापणी करावी. कापणीच्यावेळी दाण्यातील ओलाव्याचे प्रमाण १५ टक्के असावे. गव्हाची मळणी यंत्राच्या सहाय्याने करावी. मळणी करतांना दाणे फुटणार नाहीत याची काळजी घ्यावी.

### फळबाग व्यवस्थापन

- डाळिंब – रस शोषणाऱ्या फुलकिडे, फळ पोखरणारी अळी या किडींचे नियंत्रण करावे. मधमाशी पेट्यांचे संवर्धन करावे. तेल्या रोगाचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी हंगामी प्रतिबंधात्मक उपाययोजना कराव्यात. पाणी नियंत्रित वापरावे.
- सिताफळ – नत्रांची उर्वरीत मात्रा दयावी. बहार धरलेल्या बागेत मशागत पूर्ण करावी.
- बोर– बाग ताणावर सोडावी.
- आवळा – अनावश्यक फांदया काढाव्यात.
- कागदी लिंबू व मोसंबी – गरजेनुसार सुक्ष्म अन्नद्रव्यांची फवारणी करावी.

### भाजीपाला व्यवस्थापन

- उन्हाळी वेलवर्गीय भाजीपाला पिकांस खुरपणी देऊन नत्र खताचा दुसरा हप्ता द्यावा.
- वेलवर्गीय पिकांना आधार देण्याचे काम पूर्ण करावे.
- उन्हाळी भेंडी काढणी एक दिवस आड करावी.
- गवार पिकाची काढणी सुरू करावी.
- रबी टोमॅटो पिकाची काढणी योग्य वेळी करावी. लांब अंतराच्या बाजारपेठेसाठी पाठवायचे असल्यास फळांवर लाल रंगाची छटा आल्यावर टोमॅटोची काढणी करावी.
- रबी हंगामातील कोबीवर्गीय पिकांची काढणी करावी. रबी हंगामातील लसूण पिकांवर कोळी या किडीचा प्रार्दुभाव होण्याची शक्यता असते. कोळीच्या नियंत्रणासाठी योग्य ते उपाय करावेत.
- रबी हंगामातील कांदा पीक पोसण्याचे अवस्थेत असल्यास पालाशयुक्त खताचा फवारा द्यावा.
- वेलवर्गीय भाजीपाल्यावर भुरी व करपा रोगाचा प्रार्दुभाव दिसून आल्यास नियंत्रणाचे उपाय करावेत.
- कांदा व लसूण पिकावरील करपा व फुलकिडीचे नियंत्रण करावे.
- भेंडी पिकावर येणारी पांढरीमाशी विषाणूजन्य रोगाचा प्रसार करते त्यामुळे पांढरी माशीचे वेळीच नियंत्रण करावे.
- उन्हाळी टोमॅटोचे पीक एक महिन्याचे झाल्यावर खुरपणी करून नत्र खताची मात्रा द्यावी.
- मिरची व वांगी रोपे तयार झाली असल्यास रोपांची लागवड करावी लागवडीचे वेळेस संपूर्ण खतमात्रेच्या ५० टक्के नत्र, संपूर्ण स्फुरद व पालाश द्यावे.

## आले

- पूर्वमशागत जसे १ फूट खोल उभी व आडवी नांगरट करुन १ ते २ कुळवाच्या पाळ्या जमीन भुसभुशित करावी.
- हेक्टरी ७५ किलो स्फुरद व ७५ किलो पालाश या खतांचा संपूर्ण हप्ता द्यावा.
- शेवटच्या कुळवाच्या पाळी आगोदर हेक्टरी ३५ ते ४० टन चांगले कुजलेले शेणखत द्यावे.
- जमिनीतील बहुवार्षिक तणांचे कंद, काश्या वेचून गोळा कराव्यात, मोठे दगड–गोटे वेचून काढावेत.
- जमिनीच्या प्रकारानुसार लागवड प्रामुख्याने सपाट वाफे, सरी वरंबा पध्दत आणि रुंद वरंबा किंवा गादी वाफ्यावर करावी.
- सपाट वाफे पध्दतीत जमिनीच्या उतारानुसार २x१ मी. किंवा २x३ मी. चे सपाट वाफे करुन २०x२० सें.मी. किंवा २२.५x२२.५ सें.मी. अंतरावर लागवड करावी.
- सरी वरंबा पध्दतीत लाकडी नांगराच्या सहाय्याने ४५ सें.मी. वरती सऱ्या पाडून घ्याव्यात. वरंबाच्या दोन्ही बाजुस वरुन १/३ भाग सोडून २ इंच खोल, दोन रोपामधील अंतर २२.५ सें.मी. ठेवून लागवड करावी.
- रुंद वरंबा किंवा गादी वाफा पध्दत :– आधुनिक सिंचन पध्दती जसे तुषार सिंचन, ठिबक सिंचनाचा वापर केला जातो अशा ठिकाणी ही पध्दत वापरली जाते. १५ ते २० टक्के उत्पादन जास्त मिळते. जमिनीच्या उतारानुसार ९०–१२० सें.मी. वरती सरी पाडून घ्यावी म्हणजे मधील वरंबा ४५–६० सें.मी. रुंदीचा. दोन रुंद वरंब्यातील पाटाची रुंदी ४५–६० सें.मी. रुंद वरंब्याची उंची २० ते २५ सें.मी. ठेवून २२.५ सें.मी.x२२.५ सें.मी. वरती आले लागवड करावी.

## अवजारे

### ट्रॅक्टरचलित ॲटोमॅटिक पलटी नांगर

- ४० ते ४५ अश्वशक्तीच्या ट्रॅक्टरने चालवता येते.
- हा नांगर टॅक्टरच्या लिव्हरने नांगर उचल्यावर ॲटोमॅटिक पलटी होतो.
- यामध्ये मेकॅनिकल लिव्हर तसेच हायड्रोलिक सिलेंडरची गरज भासत नाही.
- जमिनीची नांगरणी योग्य त्या खोलीपर्यत करता येते.
- हलक्या, मध्यम, भारी जमिनीत उपयुक्त

प्रकाशक : **डॉ. शरद गडाख**
संचालक, विस्तार शिक्षण
प्रमुख संपादक : **डॉ. पंडित खर्डे**
प्रभारी अधिकारी, प्रसारण केंद्र
सहसंपादक : **डॉ. सचिन सदाफळ**
सहाय्यक प्राध्यापक, प्रसारण केंद्र
**श्री. सुनिल राजमाने**
कृषि सहाय्यक, प्रसारण केंद्र
डिझाईनर : **श्री. खेमचंद खैरनार**
कलाकार तथा छायाचित्रकार, प्रसारण केंद्र
**श्री. सिध्दार्थ साळवे**
लिपीक–नि–टंकलेखक, प्रसारण केंद्र
**मफुकृवि विस्तार प्रकाशन क्र. २४२९/२०२२**